Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

१७/२०२५

विषय :- शिवाजी विद्यापीठातील हंगामी रोजंदारी / एकत्रित मानधनावरील सेवकांना कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना लागू करणेबाबत.

शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर्स, प्रशासकीय अधिकारी व विभागप्रमुख यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठ कार्यालयामार्फत प्रशासकीय मान्यतेनंतर विविध अधिविभाग व प्रशासकीय विभागांना पुरविण्यात आलेल्या विविध पदावरील हंगामी रोजंदारी / एकत्रित मानधनावरील सेवकांना कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे.

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेच्या नियमानुसार ज्या हंगामी रोजंदारी / एकत्रित मानधनावरील सेवकांचे वेतन रू.१५०००/- पेक्षा कमी आहे त्या सेवकांचे भविष्य निर्वाह निधी खाते सुरू करून त्यांच्या वेतनातून कर्मचारी हिस्सा १२% व विद्यापीठ हिस्सा १२% असे एकूण २४% रक्कम संबंधित सेवकाच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यावर जमा केली जाणार आहे. तसेच ज्या सेवकांचे वेतन रू.१५०००/- पेक्षा जास्त आहे त्या सेवकांच्या वेतनातून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कपात करणे अथवा न करणे ही संबंधित सेवकाची ऐच्छिक बाब आहे. अशा सेवकांनी समंतीपत्र दिल्यानंतर त्यांना सदरची योजना लागू राहील.

सध्या शिवाजी विद्यापीठ कार्यालयात कार्यालयाने नियुक्त केलेले जे विविध पदांवरील हंगामी रोजंदारी / एकत्रित मानधनावरील सेवक कार्यरत आहेत, त्या सेवकांकरीता ही योजना लागू होणार आहे. सदर भविष्य निर्वाह निधी योजना सुरू करावयाच्या अनुषंगाने कार्यरत हंगामी रोजंदारी/एकत्रित मानधनावरील सेवकांनी या परिपत्रका सोबत दिलेल्या लिंकवरुन फॉर्म इंग्रजीमध्ये बिनचूक भरून त्याची प्रिंट काढून त्यावर खाली स्वत:ची सही करावी व फॉर्मच्या वरील बाजूच्या उजव्या कोप-यात आपला अलीकडील पासपोर्ट साईज फोटो चिटकवून त्यासोबत आपल्या खालील नमुद केलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडून तो दिनांक ०८/०४/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत आस्थापना विभाग - १ येथे जमा करणे आवश्यक आहे. या तारखेनंतर येणारे फॉर्म स्विकारले जाणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच सदर फॉर्म व कागदपत्रांची पूर्तता आपणाकडून निर्धारित वेळेत न झालेस संबंधितास वेतन अदा केले जाणार नाही.

१.आधार कार्ड (आधार कार्डवर पुर्ण जन्म तारीख असणे आवश्यक आहे व मोबाईल क्रमांकाशी आधार लिंक असणे आवश्यक)

२.पॅनकार्ड,

३.युको बँक खाते (मोबाईल क्रमांकाशी लिंक असलेले) पासबुक

४.कार्यालयीन नियुक्ती आदेश

५. पासपोर्ट साईज फोटो.

६. १० वी प्रमाणपत्र / जन्म दाखला / शाळा सोडलेचा दाखला

तसेच अधिविभाग प्रमुख व प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी विद्यापीठ निधीवरील होणा-या खर्चाची बाब विचारात घेता, हंगामी रोजंदारी / एकत्रित मानधनावरील सेवकांची संख्या नियंत्रित ठेवण्याच्या अनुषंगाने योग्य ती उपाययोजना करून शिवाजी विद्यापीठ प्रशासनास सहकार्य करावे.

अधिविभाग प्रमुख व प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक तसेच हंगामी रोजंदारी / एकत्रित मानधनावरील सेवकांच्या निदर्शनास आणावे.

डॉ. व्ही. एन. शिंदे
( कुलसचिव )

जावक क्रमांक.आस्थापना / ६९०
दिनांक:- 05 APR 2025

प्रति,

१. सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर्स, प्रशासकीय अधिकारी व विभागप्रमुख.

प्रत:- माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१. मा. कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखाअधिकारी यांचे कार्यालय.

२. इंटरनेट विभाग :- सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.